**शालांत परिक्षोत्तर (मेट्रीकोत्तर) शिक्षण घेणाऱ्या**
**अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची योजना**

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक:-इडीडी-२००३/प्र.क्र.७१/सुधार-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १५ नोव्हेंबर, २००३

प्रस्तावना :- अपंग व्यक्तींनी स्वावलंबी बनवून समाजाचा कृतिशिल घटक म्हणून जीवन जगता यावे याकरीता अपंग व्यक्तींमध्ये शैक्षणिक, व्यवसायिक व तांत्रिक पात्रता असणे आवश्यक आहे. ही पात्रता प्राप्त करून घेण्यासाठी अपंग विद्यार्थ्यांना शालेय, महाविद्यालयीन, तांत्रिक, व्यवसायिक शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्याची योजना राज्य शासनामार्फत राबविण्यात येत होती. अपंग व्यक्ती ( समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपुर्ण सहभाग) अधिनियम १९९५ मधील प्रकरण ५ शिक्षण कलम ३० (डी) प्रमाणे अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येईल. ही तरतूद विचारात घेऊन राज्यातील शिक्षण घेणाऱ्या सर्व अपंगांना या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने या योजनेत सुधारणा करणे ही बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याप्रमाणे आता शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :- राज्यातील अंध, अंशत: अंध, कर्णबधिर, अस्थिविकलांग, मतिमंद, मानसिक आजार व कुष्ठरोग मुक्त अपंग विद्यार्थ्यांना शालांत परिक्षोत्तर (माध्यमिक शिक्षणानंतरच्या) शिक्षणासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शालांत परिक्षोत्तर (मेट्रीकोत्तर) शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची योजना खालील नियम व अटी प्रमाणे राबविण्यास शासन मंजूरी देत आहे.

**योजनेचे स्वरुप व व्याप्ती :-**
या योजनेस शालांत परिक्षोत्तर (मेट्रीकोत्तर) शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची योजना असे संबोधण्यात येईल. या योजनेचा लाभ राज्यांतर्गत शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अंध, अंशत:अंध, कर्णबधिर, अस्थिविकलांग, मतिमंद, मानसिक आजार व कुष्ठरूग्णमुक्त अपंग विद्यार्थ्यास देण्यात येईल.

**शिष्यवृत्तीसाठी पात्रता :-**

१. अंध, अंशत:अंध, कर्णबधिर, अस्थिविकलांग, मतिमंद, मानसिक आजार व कुष्ठरूग्णमुक्त अपंग विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहीवासी असावा.
२. अर्जदार मान्यता प्राप्त संस्थेमध्ये अथवा मान्यताप्राप्त विद्यापीठामध्ये माध्यमिक शिक्षणानंतरचे शिक्षण घेत असलेला असावा.
३. अर्जदार ज्या मान्यता प्राप्त संस्थेमध्ये अथवा विद्यापीठामध्ये शिक्षण घेत आहे त्याचा दर्जा माध्यमिक शिक्षणाशी समकक्ष नसावा. ते माध्यमिक शिक्षणापेक्षा उच्च दर्जाचे असावे.
४. अर्जदाराने जे शिक्षण एकदा पुर्ण केलेले आहे त्याच दर्जाच्या शिक्षणासाठी त्यांनी परत शिक्षणासाठी प्रवेश घेतला तर त्यास ह्या शिष्यवृत्तीचा लाभ दिला जाणार नाही. उदा. बी.कॉम. उत्तीर्ण झाल्यानंतर प्रथम वर्ष बी.एस्सी. ला प्रवेश घेतला असेल अथवा एका विषयात एम.ए. चे शिक्षण पुर्ण करून परत एम.ए. च्या दुसऱ्या विषयासाठी प्रवेश घेतला असल्यास.
५. अर्जदाराने एकदा व्यवसायिक शिक्षण पुर्ण केल्यानंतर त्यास परत शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली जाणार नाही. उदा. एल.एल.बी. झाल्यानंतर बी.एड. साठी अशा प्रकारच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली जाणार नाही.
६. वैद्यकीय शिक्षणामधील पदवीत्तर शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना बाहेर मेडीकल प्रॅक्टीस करावयास बंदी घातली असेल अशाच विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणासाठी पदवीत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ दिला जाईल.
७. अर्जदाराने आर्टस, सायन्स, कॉमर्स मधील पदवी अथवा पदवीत्तर शिक्षण अर्धवट सोडून त्यांनी जर मान्यताप्राप्त व्यवसायिक शिक्षण, तंत्रशिक्षण प्रमाणपत्र / पदविका / पदवी शिक्षणासाठी प्रवेश घेतल्यास त्यास या शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात येईल. [illegible]

[illegible]

८. अर्जदार गट अ वगळता प्रत्येक वर्षी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. गट अ अभ्यासक्रमातील अपंग विद्यार्थी एक वेळ अनुत्तीर्ण झाला तर शिष्यवृत्ती पुढे चालू ठेवता येईल. मात्र तो दुसऱ्यांदा अनुत्तीर्ण झाल्यास त्यास शिष्यवृत्ती दिली जाणार नाही.

९. जे अर्जदार मान्यता प्राप्त विद्यापीठाचा अथवा संस्थेचा पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम पुर्ण करतात अभ्यासक्रमासाठी अथवा निरंतर शिक्षणासाठी अर्जदाराला संबंधीत संस्थेचे ना परतावा शुल्क भरावे लागत असल्यास अशा विद्यार्थ्यांना वार्षिक रूपये ५००/- आवश्यक पुस्तके व साहित्य खरेदी करण्याकरीता अर्थसहाय्य देण्यात येईल.

१०. जे विद्यार्थी पुर्णवेळ नियमित शिक्षण घेत असतील अशाच विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाईल. या कालावधीत पुर्ण वेळ नोकरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाणार नाही.

११. अर्जदार सदरहू शिक्षणासाठी गुणवत्ता शिष्यवृत्ती खेरीज इतर कोणतीही शिष्यवृत्ती अथवा विद्यावेतन घेत नसावा.

१२. अर्जदार शासनाकडून अनुदान देण्यात येणाऱ्या निशुल्क भोजन व निवासाची सोय असणाऱ्या वसतिगृहात राहत असल्यास जर त्या अर्जदारास पाठयपुस्तकेवर साहित्यावर खर्च करावा लागत असल्यास अशा अर्जदारास सदरहू खर्चाकरीता वसतिगृहवाशी विद्यार्थ्यांच्या १/३ दराने निर्वाह भत्ता देण्यात येईल.

१३. अर्जासोबत वार्षिक परिक्षेच्या निकालाची प्रत (गुणपत्रिकेची प्रत) जोडणे आवश्यक आहे.

१४. अर्जदाराने अर्जासोबत अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपुर्ण सहभाग) अधिनियम १९९५ प्रमाणे अपंग व्यक्तींना प्रमाणपत्र देण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या वैद्यकीय मंडळाचे अपंगत्व असल्याचे व अपंगत्वाचा लाभ मिळण्यास पात्र प्रमाणपत्र अर्जासोबत जोडलेले असावे.

१५. जे अपंग विद्यार्थी विद्यालयाच्या, महाविद्यालयाच्या वसतिगृहात अथवा मान्यताप्राप्त वसतिगृहात राहत असतील व त्यासाठी त्यांना वसतिगृहाचे शुल्क द्यावे लागत असल्यास अशा विद्यार्थ्यांना वसतिगृहवासी विद्यार्थ्यांच्या दराने शिष्यवृत्ती देण्यात यावी.

१६. सदरहू शिष्यवृत्ती घेण्यासाठी अपंग अर्जदारास उत्पन्नाची कोणतीही अट राहणार नाही.

टिप : याबाबत स्पष्ट करण्यात येते की, जे अपंग विद्यार्थी माध्यमिक शिक्षणानंतरचे शालांत परिक्षोत्तर गट अ ते इ मध्ये दर्शविलेल्या अभ्यासक्रमाचे शिक्षण मान्यता प्राप्त संस्थेमध्ये अथवा विद्यापीठामध्ये घेत असतील असे शिक्षण पुर्ण करण्यासाठी पाठयक्रमाच्या गरजेप्रमाणे अर्थसहाय्य शिष्यवृत्तीमधून उपलब्ध करून देण्यात येईल.

**शिष्यवृत्तीचे दर :** शिष्यवृत्तीच्या रक्कमेमध्ये निर्वाह भत्ता (अनिवासी व वसतिगृहवासी या दराने) अंध विद्यार्थ्यांसाठी वाचक भत्ता, ना परतावा सक्तीचे शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती, अभ्यासदौरा खर्च, प्रकल्प (थेसिस) टंकलेखन व छपाई खर्च, पत्र व्यवहाराद्वारेच्या शिक्षणासाठी प्रकल्प (थेसिस) टंकलेखन व छपाई खर्च व पुस्तकासाठी भत्ता इत्यादीबाबींचा समावेश राहील. या बाबींचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे -

१. निर्वाह भत्ता

| अभ्यासक्रमाचा गट | अभ्यासक्रम | निर्वाहभत्त्याची रक्कम दरमहा रूपये | |
|---|---|---|---|
| | | वसतिगृहवासी | अनिवासी |
| गट अ | वैद्यकीय / अभियांत्रिकी पदवी पर्यंतचे शिक्षण, युनानी मेडीसिन, आयुर्वेदिक (बी.ए.एम.अॅण्ड एस) आणि इतर समकक्ष आयुर्वेदिक शिक्षण युनानी / टिबीया आणि होमियापॅथीक प्रकारातील वैद्यकीय शिक्षणासह, बी.एस सी.(अॅग्री.)/बी.व्ही.एस.सी./बी.एफ.एस सी. (फिशरीज). अॅग्रीकल्चर आणि व्हिटर्नरी सायन्स मधील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासारखे उच्च तांत्रिक आणि सर्व व्यवसायिक शिक्षण. | ४२५/- 1200 | १९०/- |
| गट ब | भारतीय वैद्यक शास्त्र (इंडियन मेडिसीन) आणि या समकक्ष असणारे आयुर्वेदिक युनानी टिबीया आणि होमीओपेथीक वैद्यकीय प्रकारातील पदविका | २९०/- 420 | १९०/- |

Scanned with CamScanner

63

अभ्यासक्रम (डिप्लोमा)

अभियांत्रिकी, तांत्रिकी, स्थापत्य, वास्तुशास्त्र, मेडिसीन यामधील पदविका अथवा समकक्ष अभ्यासक्रम

प्रिंटींग टेक्नॉलॉजी, पदविका अभ्यासक्रम व ओव्हरशेअर ड्राफ्टमन, सर्व्हेअर, कमर्शियल पायलट लायसन्स मधील पदविका अथवा समकक्ष अभ्यासक्रम, हॉटेल मॅनेजमेंट, केटरींग टेक्नॉलॉजी आणि अप्लाय न्युट्रीशियन्स मधील पदविका आणि उच्च प्रशिक्षण अभ्यासक्रम.

नर्सिंग आणि फार्मसीमधील पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम

वायरलेस आणि टेलिव्हीजन ऑपरेटर/ साऊंड रेकॉर्डींग आणि साऊंड इंजिनिअरींग, मोशन पिक्चर, फोटोग्राफी फिल्म डायरेक्शन, स्क्रीन प्ले, कथा लेखन मधील पदवी अथवा पदव्युत्तर अभ्यासक्रम

बीझनेस मॅनेजमेंट, चार्टर्ड अँण्ड कॉस्ट वर्क अकौंटसीमधील पदवी अथवा पदव्युत्तर पदविका

विज्ञानामधील (सायन्स) पदव्युत्तर शिक्षण

| | | | | |
|---|---|---|---|---|
| गट क | अभियांत्रिकी, स्थापत्य, वास्तुशास्त्र, तंत्रज्ञ आणि मेडीसीन मधील प्रमाणपत्र अभ्यासक्रम | २१०/- | ११०/- | (530) |

ॲग्रीकल्चर, फॉर्मसी, व्हिटरनरी सायन्स, डेअरी डेव्हलपमेंट, हायजीन आणि पब्लीक हेल्थ, ग्रामिण भागातील आरोग्य सेवेसाठी सॅनिटरी इंस्पेक्टर कोर्स, सहकाराने सामुहिक विकासामधील प्रशिक्षण, नागपूर येथील राष्ट्रीय अग्निशामक स्कूलमधील सब ऑफीसर प्रशिक्षण, ग्रंथगार शास्त्र इत्यादी मधील पदविका अथवा प्रमाणपत्र अभ्यासक्रम.

शिक्षक प्रशिक्षण, लायब्ररी सायन्स आणि शारिरीक शिक्षण, संगित, फाईन आर्ट, जेडी आर्ट आणि विधी क्राफ्ट इंस्पेक्टर ट्रेनिंग कोर्स मधील पदवी अथवा पदव्युत्तर पदविका अथवा पदव्युत्तर पदवी कोर्स.

हॉटेल मॅनेजमेंट, केटरींग टेक्नॉलॉजी आणि अप्लाईड न्युट्रीशियन मधील प्रमाणपत्र अभ्यासक्रम, पॅसेंजर ट्रान्सपोर्ट मॅनेजमेंट मधील प्रमाणपत्र अभ्यासक्रम, असोसिएटस डिग्री इन फार्मसी, समाज प्रशासन व समाज कार्य, कला आणि वाणिज्य शाखेतील पदव्युत्तर शिक्षण

| | | | | |
|---|---|---|---|---|
| गट ड | सर्वसाधारण पदवी पर्यंतचा अभ्यासक्रम (द्वितीय वर्ष व त्यानंतर) | २३०/- | १२०/- | 300 |
| गट इ | १०+२ अभ्यासक्रमातील इयत्ता ११ वी व १२ वी तसेच सर्वसाधारण पदवीपर्यंत अभ्यासक्रमाचे प्रथम वर्ष. | १५०/- | ९०/- | |

टिप :

१. एम फील आणि पी एच डी अभ्यासक्रमामधील विद्यार्थ्यांना पदव्युत्तर अभ्यासक्रमाप्रमाणे गट अ, ब, क मधील वर्गवारीनुसार त्यांच्या दर्जाप्रमाणे निर्वाह भत्ता दिला जाईल.

२. जे विद्यार्थी ज्या शिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेत आहेत, त्यांच्या अधिपत्याखालील वसतिगृहात राहत असतील व त्यांना शुल्क भरावे लागत असेल अशा विद्यार्थ्यांना वसतिगृह वासी विद्यार्थी समजण्यात येईल. ज्या शिक्षण संस्थेत त्यांच्या अधिपत्याखालील वसतिगृहात विद्यार्थ्यांस प्रवेश देऊ शकत नसतील असे त्यांचे प्रमाणपत्र घेतल्यानंतर विद्यार्थ्याने इतर वसतिगृहात प्रवेश घेतला असेल त्या विद्यार्थ्यांस शुल्क द्यावे लागत असेल, हे वसतिगृह वसतिगृहासाठी असलेल्या नियमाप्रमाणे चालविले जात असेल असे शिक्षण संस्थाने प्रमाणित केल्यानंतर अशा विद्यार्थ्यांस वसतिगृहवासी विद्यार्थ्यांच्या दराने निर्वाह भत्ता देण्यात येईल. अशा वसतिगृहामध्ये एकत्रित मेससह (जेवणाच्या सोईसह) किमान ५ विद्यार्थ्यांपेक्षा जास्त विद्यार्थी असणे आवश्यक आहे.

३. अर्जदार शासनाकडून अनुदान देण्यात येणाऱ्या निशुल्क भोजन व निवासाची सोय असणाऱ्या वसतिगृहात राहत असल्यास वसतिगृहवासी विद्यार्थ्यांच्या १/३ दराने निर्वाह भत्ता देण्यात येईल.

२. वाचक भत्ता : अंध विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसोबत खालील दराने वाचक भत्ता देण्यात येईल.

| गट | वाचक भत्ता दरमहा रूपये |
|---|---|
| गट अ, ब, क | १००/- |
| गट ड | ७५/- |
| गट इ | ५०/- |

३. शुल्क : अर्जदारांना विद्यापीठ / संस्था / बोर्डाला भरावे लागणारे सक्तीचे शुल्क प्रवेश फी, टयूशन फी, नोंदणी फी, जिमखाना, युनियन, लायब्ररी, मॅगेजिन, वैद्यकीय तपासणी यासारखे इतर द्यावे लागणारे सक्तीचे शुल्काकरीता रक्कम मंजूर करण्यात येईल. विद्यार्थ्यांना भराव्या लागणाऱ्या परतावा, डिपॉझिट, कोशनमनी, सिक्युरिटी डिपॉझिट इत्यादी सारख्या रक्कमा मिळणार नाहीत.

४. अभ्यासदौरा : व्यवसायिक आणि तांत्रिक शिक्षणाकरीता ज्या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना अभ्यासदौरा सक्तीचा आहे. अशा अभ्यासदौऱ्याच्या प्रत्यक्ष प्रवास खर्चाची रक्कम अथवा रूपये ५०० वार्षिक पर्यंत मर्यादित अभ्यासदौरा खर्च मंजूर करण्यात येईल. मात्र असा अभ्यासदौरा विद्यार्थ्यास अनिवार्य असल्याचे संबंधीत संस्थेच्या संस्था प्रमुखाने प्रमाणित केलेले असणे आवश्यक आहे.

५. प्रकल्प (थेसीस) टंकलेखन व मुद्रण खर्च : शिक्षण संस्था प्रमुखाच्या शिफारसीप्रमाणे संशोधनात्मक कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रकल्प (थेसीस) टंकलेखन व मुद्रणासाठी येणाऱ्या खर्चाकरीता वार्षिक रूपये ६००/- पर्यंत रक्कम मंजूर करण्यात येईल.

- शिष्यवृत्तीचे प्रदान - राज्यातील राज्यांतर्गत शिक्षण देणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांस शिष्यवृत्तीसाठी विहीत नमुन्यातील अर्ज संबंधीत विद्यालयाच्या / महाविद्यालयाच्या / शिक्षण संस्थेच्या प्रमुखामार्फत मुंबई व मुंबई उपनगर जिल्हयांकरीता विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी व इतर जिल्हयात समाज कल्याण अधिकारी, गट अ, जिल्हा परिषद यांचेकडे विहीत केलेल्या मुदतीत सादर करावे लागतील. प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करून पात्र अर्जदारास मुंबई व मुंबई उपनगर या जिल्हयात विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी व इतर जिल्हयात समाज कल्याण अधिकारी, गट अ, जिल्हा परिषद शिष्यवृत्ती रक्कम मंजूर करतील. मंजूर केलेली शिष्यवृत्ती संबंधीत विद्यालयाच्या / महाविद्यालयाच्या / शिक्षण संस्था प्रमुखाच्या मार्फत संबंधीत विद्यार्थ्यास अदा करण्यात येईल. संबंधीत विद्यालयाच्या / महाविद्यालयाच्या / शिक्षण संस्था प्रमुखाने मंजूर शिष्यवृत्ती संबंधीत विद्यार्थ्यास अदा केल्याची विद्यार्थ्यांची पोहोच पावती व विनियोग प्रमाणपत्र वरील कार्यालयास सादर करावे लागेल.

अर्जदारास निर्वाह भत्त्याचे रक्कम १ एप्रिल पासून अथवा प्रवेश घेतलेल्या महिन्यापासून ते शैक्षणिक वर्षा अखेर पर्यंतच्या कालावधी करिता (सुट्टीसह) देण्यात येईल. अर्जदाराने महिन्यापासून 20 तारखेपूर्वी प्रवेश घेतल्यास त्या महिन्याचा निर्वाहभत्ता देण्यात येईल. 20 तारखेनंतर प्रवेश असल्यास तो महिना धरला जाणार नाही.

Scanned with CamScanner

नोंही.

नुतनीकरण प्रकारामध्ये अर्जदारास ज्या महिन्यापर्यंत मागील शैक्षणिक वर्षात निर्वाह भत्ता मंजूर करण्यात आलेला आहे. त्या महिन्यानंतर ते शैक्षणिक वर्षअखेरपर्यंतच्या कालावधीकरीता निर्वाह भत्ता मंजूर करण्यात येईल.

सदरहू निर्वाह भत्त्यामधून विद्यार्थ्याने अभ्यासक्रमासाठी लागणारे क्रमिक पुस्तके, स्टेशनरी इत्यादीसाठी खर्च करणे आवश्यक आहे. संबंधीत संस्था प्रमुखाने अशा प्रकारचे बाबी विद्यार्थ्याने घेतल्या नसल्याचे सक्षम प्राधिकाऱ्यास कळविल्यास असा अधिकारी निर्वाह भत्याच्या रक्कमेमध्ये कपात करू शकतो.

वैद्यकीय अभ्यासक्रमातील एम.बी.बी.एस. अथवा समकक्ष अभ्यासक्रमानंतर जे विद्यार्थी इंटरन्सीप अथवा हाऊसमनशिप करीत आहेत अशा विद्यार्थ्यांना इंटरन्सीप, हाऊसमनशिप कालावधीत भत्ते अथवा विद्यावेतन मिळत असल्याने या शिष्यवृत्तीचा लाभ दिला जाणार नाही.

- **शिष्यवृत्तीसाठी इतर अटी :**

१. सदरहू शिष्यवृत्ती अर्जदाराच्या समाधानकारक शैक्षणिक प्रगतीवर अवलंबून राहील. संबंधीत संस्था प्रमुख वेळोवेळी तसा अहवाल सादर करेल. अर्जदार गैरवर्तणूकीबद्दल अपराधी असेल वारंवार संपात भाग घेत असेल, उपस्थितीमध्ये अनियमितता असेल इत्यादी बाबी संस्था प्रमुखाने मंजूरी अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून दिल्यास अर्जदाराला मंजूर केलेली शिष्यवृत्ती स्थगित केली जाईल.

२. अर्जदाराने अर्जामध्ये खोटी माहिती दिल्याचे आढळल्यास सदरहू अर्जदाराची शिष्यवृत्ती रदद करून मंजूर केलेली शिष्यवृत्ती अर्जदाराकडून वसुल केली जाईल तसेच त्याचे नांव शिष्यवृत्तीसाठीच्या काळयायादीत नमूद करण्यात येईल.

३. अर्जदारास ज्या अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आलेली आहे त्या अर्जदाराने पुर्वपरवानगी न घेता परस्पर तो अभ्यासक्रम बदलून इतर अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यास अशा अर्जदाराची शिष्यवृत्ती बंद केली जाईल व दिलेली शिष्यवृत्ती वसूल केली जाईल.

४. अर्जदारास शिष्यवृत्तीसाठी वेळोवेळी घालून दिलेल्या नियमाचे पालन करणे बंधनकारक राहील.

**शिष्यवृत्तीचा कालावधी व नुतनीकरण :** ज्या अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती मंजूर केली आहे तो अभ्यासक्रम पुर्ण होईपर्यंत विद्यार्थ्याची चांगली वर्तणूक व उपस्थितीतील नियमितता या बाबी पाहून शिष्यवृत्तीचे नुतनीकरण करण्यात येईल. यासाठी अर्जदारास प्रतिवर्षी संबंधीत संस्था / विद्यापीठ / बोर्ड मार्फत घेतलेली परिक्षा उत्तीर्ण व्हावी लागेल. अथवा प्रतिवर्षी वरच्या वर्गात प्रवेश घेतलेला असेल. अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यास अथवा त्याच वर्गात राहीलेल्या विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती मंजूर केली जाणार नाही. मात्र तो उत्तीर्ण झाल्यानंतर त्यास शिष्यवृत्ती पुन्हा सुरू करण्यात येईल. फक्त गट अ मधील अभ्यासक्रमामध्ये एक वेळ अनुत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर केली जाईल तो दुसऱ्या वर्षी त्याच वर्गात अनुत्तीर्ण झाल्यास शिष्यवृत्ती बंद करण्यात येईल. मात्र तो उत्तीर्ण झाल्यानंतर त्यास शिष्यवृत्ती पुन्हा सुरू करण्यात येईल.

अर्जदार वार्षिक परिक्षेत अनुत्तीर्ण झाला असेल परंतु अर्जदारास विद्यापीठाच्या अथवा संस्थेच्या नियमाप्रमाणे (ए.टी.के.टी) लाभ देऊन वरच्या दर्जाच्या वर्गात प्रवेश दिला गेल्यास अशा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ दिला जाईल.

अभ्यासक्रमाचे प्रथम वर्षाचे विद्यार्थी तसेच अभ्यासक्रमाच्या मध्यात प्रथमच शिष्यवृत्तीसाठी अर्ज करणारे विद्यार्थी हे नवीन अर्जदार समजून त्यास शिष्यवृत्ती मंजूर केली जाईल.

**अर्ज करण्याची पध्दत :**

१. अर्जदाराने वरील शिष्यवृत्तीचे अर्ज शिक्षण घेत असलेल्या संबंधीत विद्यालय / महाविद्यालयामार्फत /संबंधीत शिक्षण संस्था प्रमुखामार्फत मुंबई व उपनगर या जिल्ह्यात विशेष समाज कल्याण अधिकारी व इतर जिल्ह्यामध्ये समाज कल्याण अधिकारी, गट अ. जिल्हा परिषद यांचेकडे प्रतिवर्षी सादर करावेत.

२. अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख प्रतिवर्षी समाज कल्याण अधिकारी यांनी केलेल्या वृत्तपत्रातील निवेदनाप्रमाणे अथवा निर्गमित केलेल्या परिपत्रकाप्रमाणे राहील.

३. अभ्यासक्रमातील प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना अथवा अभ्यासक्रमाच्या मध्यात नव्यानेच अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांने शिष्यवृत्तीसाठी परिशिष्ठ अ प्रमाणे विहीत नमुन्यात नवीन अर्जदार म्हणून अर्ज करावा.



Scanned with CamScanner

५. एक अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर त्या अभ्यासक्रमावरील वर्गाच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतल्यास त्या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षी नवीन अर्ज करावेत.

६. अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे : (१) विहीत नमुन्यातील शिष्यवृत्तीसाठीचा अर्ज (नवीन परिशिष्ट अ प्रमाणे) नूतनीकरण (परिशिष्ट ब प्रमाणे) (२) पासपोर्ट आकाराचा अर्जदाराचा फोटोग्राफ स्वतःची स्वाक्षरी केलेला (नवीन अर्जदारासाठी) (३) प्रमाणपत्र, पदवी, पदविका परीक्षा उत्तीर्ण केलेल्या प्रमाणपत्राची सत्यप्रत (३) मागील वर्षाच्या वार्षिक परीक्षेच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत.(४) अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ प्रमाणे अपंग व्यक्तींना प्रमाणपत्र देण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या वैद्यकीय मंडळाने अपंग योजनेचा लाभ घेण्यास पात्र असल्याचे मंजूर केलेले अपंगत्वाचे प्रमाणपत्र. (५) अभ्यासक्रमामध्ये खंड निर्माण झाला असल्यास खंडाच्या कालावधीत अर्जदार इतरत्र नोकरी करीत नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र. (६) अंध विद्यार्थ्यांच्या बाबतीत वाचक नियुक्त केल्याचे संबंधीत संस्था प्रमुखाचे प्रमाणपत्र (७) मागील वर्षी शिष्यवृत्तीची रक्कम मिळाल्याची पोहोच पावती . संबंधीत संस्था / विद्यालय / महाविद्यालय व संस्था प्रमुखाच्या प्रतिस्वाक्षरीसह.

७. विहीत मुदतीनंतर शिष्यवृत्तीसाठी प्राप्त झालेल्या अर्जाचा शिष्यवृत्ती मंजूरीसाठी विचार केला जाणार नाही.

शालांत परीक्षोत्तर (मॅट्रीकोत्तर) शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची योजना या योजनेस सन २००३-०४ या आर्थिक वर्षापासून मंजूरी देण्यात येत असून या योजनेच्या अंमलबजावणीसाठी येणारा खर्च खालील लेखाशिर्षाखालील मंजूर असलेल्या आर्थिक उपलब्ध तरतुदीतून करण्यास शासन मंजूरी देत आहे.

लेखाशिर्ष :

**योजनेत्तर (राज्यस्तर)**

२२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण,
०२-समाज कल्याण,
१०१- अपंग व्यक्तींचे कल्याण,
(५) शारिरीकदृष्टया अपंगांसाठी इतर योजना
(०५)(०१) शारिरीकदृष्टया अपंगांना शिष्यवृत्त्या व उद्योगातील प्रशिक्षण
(२२३५-०११-९) मागणी क्रमांक एन- ८
४०-विद्यावेतने/ शिष्यवृत्ती

**योजनेत्तर (स्थानिकस्तर)**

२२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण,
०२-समाज कल्याण,
१०१-अपंग व्यक्तींचे कल्याण,
महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या
कलम १८२ अन्वये जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदाने (अर्थोपाय अग्रिमाशी समायोज्य)
(०८)(०६) शारिरीकदृष्टया अपंगाना शिष्यवृत्त्या व उद्योगातील प्रशिक्षण
(२२३५-२७३-३) मागणी क्रमांक एन-४
४०-विद्यावेतने/ शिष्यवृत्ती

**योजनांतर्गत** (राज्यस्तर)

२२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण
०२-समाज कल्याण,
१०१-अपंग व्यक्तींचे कल्याण,
(५) शारिरीकदृष्टया अपंगांसाठी इतर योजना पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०५)(१०)

४०-विद्यावेतने/ शिष्यवृत्ती

**योजनांतर्गत (स्थानिकस्तर)**

२२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण,

०२-समाज कल्याण,

१०१-अपंग व्यक्तींचे कल्याण,

पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (२८७ अन्वये जिल्हा परिषदांना अनुदाने) (योजनांतर्गत योजना) (अर्थोपाय अग्रिमाशी समायोज्य)

(०८) (०९) आठवीपर्यंतच्या शारिरीकदृष्टया अपंग विद्यार्थ्यांसाठी राज्य सरकारच्या शिष्यवृत्या

(२२३५-२७६-२) मागणी क्रमांक एन-४

४०-विद्यावेतने/ शिष्यवृत्ती

आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना याप्रकरणी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून, त्यांना किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यास याबाबतच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.७३१/०३/व्यय-१४, दिनांक ३/१०/२००३ ला अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

वैअपारकर

**(वै. अ. पारकर)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१ मा.राज्यपाल यांचे सचिव.

२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.

३. मा.मुख्य सचिव.

४. आयुक्त, अपंग कल्याण, म.रा. पुणे १.

५. सर्व विभागीय समाज कल्याण अधिकारी.

६. सर्व समाज कल्याण अधिकारी, गट अ, जिल्हा परिषद.

७. विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, मुंबई शहर / उपनगर.

८. महालेखापाल -१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षण) मुंबई

९. महालेखापाल - २ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षण) नागपूर

१०. सर्व कोषागार अधिकारी.

११. वित्त विभाग/ नियोजन विभाग मंत्रालय, मुंबई ३२.

१२. कक्ष अधिकारी (नियोजन / अर्थ संकल्प/मावक-१) सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

१३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.

१४. निवड नस्ती - सुधार २.

New Scheme



सदर शासन शुद्धिपत्रक क्र. अपंग-२००३/प्र.क्र.७१/सुधार-२ दि. २९ मार्च २००३, नुसार दुरुस्ती नोंद केली आहे.
प्राप्त दि. २०।५।०४

Scanned with CamScanner